# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २४/०६/२०२४ (सोमवार)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक २४/०६/२०२४ रोजी चे ०९.०० वा. दरम्यान पो. स्टे. सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना मौजा पाटणसांवगी खापा फाटा येथे बोलेरो पिकअप गाडी वाहणातून अवैधरित्या निर्दयतेने जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने सावनेर येथील मौजा पाटणसांवगी खापा फाटा येथे नाकाबंदी करून, वाहने तपासात असताना एक बोलेरो पिकअप वाहन येतांना दिसले त्या वाहनावर संशय आल्याने त्यास थांबवुन सदर वाहनाची पाहणी केली असता बोलेरो पिकअप गाडी क्र. एम एच ४० सि टी –१३३२ मध्ये ०५ नग म्हशी जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने आरोपींच्या ताब्यातून ०५ नग म्हशी जनावरे प्रत्येकी ३०,०००/–रू प्रमाणे एकुण १,५०,०००/–रू. व बोलेरो पिकअप गाडी कं. एम एच ४० सि टी –१३३२ किंमती १,०००,०००/–रू. असा एकूण ११,५०,०००/– रू चा माल जप्त करण्यात आला असून आरोपी बोलेरो पिक अप गाडी कं. एम एच ४० सि टी –१३३२ चा चालक नामे १) सुभाष रघु मांडेकर २) वाहक आकाशा अमरसिंग मसराम ३) गाडी मालक संताराम सुमेर पहाडे रा. सिलोरा त. बिचवा जि. छिदवाडा यांचे विरुद्ध कलम २७९, १०९, ३४ भादंवि., सहकलम ३, ११(१), ११(१), डी), ११(१),(सी), ११(१), (जी), प्राणि छळ प्रतिबंधक अधि. १९६०, सहकलम ११९, महाराष्ट्र पोलीस अधिकनियम १९५१, सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी सावनेर विभाग सावनेर तथा सहायक पोलीस अधिक्षक श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोनि रविंद्र मानकर, सपोनि मोकासे, पोहवा चटप, पोना रंजन कांबळे यांनी पार पाडली.

# दुखापत करण्याच्या तयारीने जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस मौदा पोलीसांनी केले अटक

पोस्टे मौदा अंतर्गत मौजा सावळी फाटा येथे दि. २३/०६/२०२४ चे १८/०० वा. ते १८/१५ वा. दरम्यान आरोपी नामे– १) रूपेश महेश यादव वय २० वर्ष रा. भांडेवाडी डम्पींग यार्ड जवळ नागपूर २) विधीसंघर्ष बालक यांनी संगनमत करून फिर्यादी नामे– राजेश विनायक रामटेके, वय ३३ वर्ष, रा. सावळी ता. कामठी जिल्हा नागपूर याच्या भावा जवळील रेडमी कंपनीचा मोबाईल हिसकावुन घेवुन पळुन जात असता यातील फिर्यादीने त्याला अडवत असता यातील आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर लोखंडी खुटीने मारून जखमी केले व त्या ठिकाणा वरून मोबाईल घेवुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून आरोपीविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३९४, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपी क्र. ०१ यास मौदा पोलीसांनी अटक केली आहे.

सदरची कार्यवाही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार सतिशसिंग राजपूत यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर